**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२७०**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २८ मार्च, २०२२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी झालेल्या २७०व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बांठिया<br>१००३/१००४, १० वा मजला,<br>बिल्डींग नं.३-ए, ग्रीन एकर्स,<br>लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (प),<br>मुंबई – ४०० ०५३ | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| प्रशासक<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई - ४०० ००१. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

****

**<u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या</u>**
**<u>२७०व्या बैठकीचे कार्यवृत्त</u>**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **२२ मार्च, २०२२ (मंगळवार)** |
| **वेळ** | **:** | **दुपारी ०४.०० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष<br>६वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई — ४०० ०३२.<br><u>(प्रत्यक्ष व दूरचित्रसंवादाद्वारे)</u>** |

**<u>उपस्थित सदस्य :</u>**

| | | |
|---|---|---|
| श्री. मनु कुमार श्रीवास्तव<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठिया | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये | - | सदस्य |
| श्री. एस.व्हि.आर.श्रीनिवास<br>महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| श्री. भूषण गगराणी<br>अपर मुख्य सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |

**<u>निमंत्रित :</u>**

श्री. ओ.पी.गुप्ता
प्रधान सचिव (व्यय),
वित्त विभाग

डॉ. के.एच.गोविंद राज
अतिरिक्त महानगर आयुक्त (२)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सुनिल वांढेकर
प्रमुख अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. अंकुश नवले
वित्तीय सल्लागार
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. एम.एस.देवरू
प्रमुख (अ.का.),
परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. बसवराज एम. भद्रगोड
मुख्य अभियंता / संचालक (प्रकल्प-२ब), (अ.का.),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रदिप यादव
प्रमुख,
नगर रचना,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती सु.भू.पेदे
सचिव, कार्यकारी समिती

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत व अभिनंदन केले.

श्री. के. जी. परांजपे, माजी मुख्य सचिव तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे दिनांक १३ डिसेंबर,२०२१ रोजी दु:खद निधन झाले. श्री परांजपे हे दिनांक १ ऑगस्ट, १९८६ ते ३१ऑगस्ट, १९८८ ह्या कालावधीत मुख्य सचिव या नात्याने कार्यकारी समितीचे अध्यक्ष होते. त्यांच्या निधनाबाबत एक मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

श्री. सीताराम कुंटे व श्री. देबाशीष चक्रवर्ती, तत्कालीन मुख्य सचिव यांनी कार्यकारी समितीचे **'पदसिध्द अध्यक्ष'**म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या २६९व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : अ) प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या मागील (२६९व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल**

**ब) कार्यकारी समितीच्या दिनांक १८.०२.२०२१ रोजी झालेल्या २६७व्या बैठकीच्या बाब क्र.४ वरील सद्य:स्थिती अहवाल**

२.१ कार्यकारी समितीने कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र. ३ : मुंबई महानगर प्रदेशामधील महावीर नगर मेट्रो स्थानक-पॅगोडा-गोराई या शहरी हवाई रज्जू मार्गाची सार्वजनिक-खाजगी-भागिदारी (PPP) तत्वावर अंमलबजावणी करण्याकरीता M/s. Lewa Trading Industry and Contracting Pvt.Ltd., सौदी अरेबिया यांची सवलतदार म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी मिळण्याबाबत.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शहरी हवाई रज्जू मार्ग मार्फत मेट्रो मार्ग २अ (महावीर नगर मेट्रो स्थानक) व उपनगरीय रेल्वे (बोरिवली) या स्थानकांना अंतिम गंतव्य ठिकाण पॅगोडा व गोराई गाव येथे जोडण्यात येईल. या शहरी हवाई रज्जू मार्गाचा विस्तार प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे.इंडियन पोर्ट रेल आणि रोपवे कॉर्पोरेशन लिमिटेड (IPRCL), Ministry of Shipping या केंद्र सरकारच्या अंतर्गत संस्थेला सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आणि सदर प्रकल्प सार्वजनिक-खाजगी-भागिदारी (PPP) तत्वावर अंमलबजावणी करण्याच्या निविदा प्रक्रियेसाठी सल्लागार म्हणून सामंजस्य कराराच्या माध्यमातून एकस्त्रोत तत्वावर नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मे. इंडियन पोर्ट रेल या सल्लागाराने चारकोप-मार्वे आणि महावीर नगर मेट्रो स्थानक-पॅगोडा-गोराई या मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये प्राधिकरणास सादर केला आहे.

३.२ चर्चे दरम्यान असे नमूद केले की, प्राधिकरणाच्या दिनांक ०७ जुलै, २०२० रोजी झालेल्या १४९ व्या बैठकीत बोरीवली-गोराई (८ कि.मी.) आणि मालाड-मार्वे (४.५ कि.मी.) हवाई रज्जू मार्गाऐवजी अनुक्रमे महावीर नगर मेट्रो स्थानक-पॅगोडा-गोराई (७.२ कि.मी.) व चारकोप मेट्रो स्थानक - मार्वे (३.६ कि.मी.) च्या मार्गिकेच्या सुधारणेस मान्यता देण्यात आली. महावीर नगर मेट्रो स्थानक - पॅगोडा - गोराई (७.२ कि.मी.) या हवाई रज्जू मार्गाची सार्वजनिक - खाजगी भागीदारी (PPP) DBFOT तत्वावर अंमलबजावणी करण्यात मान्यता देण्यात आली तसेच चारकोप मेट्रो स्थानक ते मार्वे (३.६ कि.मी.) सध्या सुसाध्य नसल्याने या हवाई रज्जू मार्गाची अंमलबजावणी

महावीर नगर मेट्रो स्थानक-पॅगोडा-गोराई शहरी हवाई रज्जू मार्ग अंमलबजावणी यशस्वीरित्या पार पाडल्यानंतर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

३.३ महावीर नगर पॅगोडा-गोराई हवाई रज्जू मार्ग महावीर नगर मेट्रो स्थानक-मेट्रो मार्ग २ अ स्थानकापासून बोरसपाडा रोड/आर सी एम रोड २५ मार्ग खाडी पार करुन एस्सेल वर्ल्ड/ पॅगोडा गोराई-बोरिवली रोड मार्ग गोराई असा प्रस्तावित असून ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | वर्णन | माहिती |
|---|---|---|
| १) | एकूण लांबी | ७.२ कि.मी. |
| २) | एकूण स्थानके | ८ |
| ३) | वेग | ६ मी./ सें. |
| ४) | प्रवासाचा वेळ | ३६ मि. |
| ५) | ताशी क्षमता | ३००० प्रवासी / प्रती तास (अंतिम क्षमता) |
| ६) | प्रकल्पाची किंमत | रु. ५६८.३ कोटी |
| ७) | मुळ भाडे | रु.१०/- प्रति कि.मी. |
| ८) | वार्षिक प्रवाशी संख्या | वर्ष २०२५: १,०३,४९,२९० |
| ९) | प्रकल्प वित्तीय परतावा (Project IRR) | १४.३% |

३.४ हवाई रज्जू मार्गाबाबत सद्यस्थितीची माहिती देताना असे सांगितले की, प्राधिकरणाने महावीर नगर मेट्रो स्थानक-पॅगोडा-गोराई (७.२ कि.मी.) या शहरी हवाई रज्जू मार्गाचे सार्वजनिक-खाजगी-भागिदारी (PPP) तत्वावर अंमलबजावणी करण्यासाठी तसेच सवलतदाराची नियुक्ती करण्यासाठी पहिला निविदा विनंती प्रस्ताव दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला. परंतु, कोव्हीड-१९ महामारीचा प्रादुर्भाव असल्याने बाजारात मंदी असल्याकारणाने सदर निविदा विनंती प्रस्तावास कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

अनुषंगाने दिनांक १९ ऑगस्ट, २०२० रोजी दुसरा निविदा विनंती प्रस्ताव संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला. सदर विनंती प्रस्तावास अनुलक्षून निविदा पूर्व बैठकी आयोजित करण्यात आल्या. तद्नंतर, संभाव्य सल्लागारांनी सुचविलेल्या विनंतीनुसार पात्रता निकषांमध्ये काही सुधारणा करून त्याबाबतचे शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले. प्रस्ताव स्विकारण्याच्या अंतिम तारखेस दिनांक १२ फेब्रुवारी, २०२१ रोजी एकूण २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदाकारांची नावे खालीलप्रमाणे आहेत :-

१. M/s. Lewa Trading Industry and Contracting Pvt. Ltd. Saudi Arabia
२. M/s. Suyog Telematic Limited, Mumbai

३.५ सदर प्राप्त झालेल्या दोन्ही निविदांचे लिफाफे (Envelope - A&B) निविदा दस्तावेज / CSD मध्ये नेमणूक केलेल्या पात्रता निकषांनुसार मुल्यमापन मे. इंडियन पोर्ट रेल कॉर्पोरेशन लिमिटेडद्वारे करण्यात आले. प्रस्तावित हवाई रज्जू मार्ग निविदेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | वैशिष्ट्ये | वर्णन |
|---|---|---|
| १. | कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security) | रु. १७ कोटी |
| २. | सवलत कालावधी (Concession Period) | ४० वर्ष (बांधकाम कालावधी सह) |
| ३. | बांधकाम कालावधी (Construction Period) | २ वर्ष |
| ४. | अटी पुर्तता कालावधी (Condition Precedent Period) | १ वर्ष |
| ५. | प्रकल्प विकास शुल्क (Project Development Fee) | रु. १ कोटी (स्वीकृती पत्रानंतर २१ दिवसात) |
| ६ | काम प्रदान करण्याचा निकष (Bidding Parameter) | (One Time Premium) एकवेळ **'प्रिमीयम'** जो निविदाकर सर्वात जास्त 'Premium Price' प्राधिकरणास देईल तो यशस्वी निविदाकर म्हणून निवडला जाईल.<br>**Lowest Grant (कमी अनुदान)** जेथे कोणताच निविदाकार one-time premium प्राधिकरणास देत नसेल तेथे जो निविदाकार सर्वात कमी अनुदान प्राधिकरणाकडून मागेल तो यशस्वी निविदाकर म्हणून निवडला जाईल. |

३.६ चर्चेदरम्यान नफा-तोटा हिस्सा या संदर्भात असे सांगितले की, सदर शहरी हवाई रज्जू मार्गातून तिकीट विक्रीतुन प्राप्त होणारा महसुल हा संबंधीत तिकीटदर आणि अंदाजीत 'किलोमीटर आधारीत गट' प्रवासी संख्या यानुसार काढला जाईल. एकुण अंदाजीत महसुल हा सर्व किलोमीटर आधारीत गट तिकीटदर आणि किलोमीटर आधारीत गट प्रवासी संख्या यांच्या गुणाकाराची बेरीज असेल.

तिकीट विक्रीतुन प्राप्त होणारा प्रत्यक्ष महसुल हा अंदाजीत महसुलापेक्षा २०% पर्यंत कमी/अधीक असल्यास तेथे कोणताही 'नफा-तोटा हिस्सा' प्रमाण लागु असणार नाही.

तिकीट विक्रीतून प्राप्त होणारा महसुल हा उल्लेखीत अंदाजीत महसुलापेक्षा २०% हून अधिक असल्यास २०% पेक्षा जास्त असलेल्या महसुलाच्या ५०% रक्कम ही सवलतदारामार्फत प्राधिकरणाकडे नफ्याचा हिस्सा (Gain-Share) म्हणुन वर्ग होईल.

तिकीट विक्रीतून प्राप्त होणारा महसुल हा उल्लेखीत अंदाजीत महसुलापेक्षा २०% हून कमी असल्यास २०% पेक्षा कमी असलेल्या महसुलाच्या ५०% रक्कम ही प्राधिकरणातर्फे सवलतदाराला तोट्याचा हिस्सा (Pain-Share) म्हणुन दिली जाईल.

३.७ महावीर नगर मेट्रो स्थानक-पॅगोडा-गोराई या प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत रू.५६८.३ कोटी अंतिम अहवालात सादर करण्यात आली. अतिरिक्त महानगर आयुक्त-१ यांच्या अध्यक्षतेखाली सदर कामासाठी तांत्रिकी सल्लागार समिती गठीत करण्यात आली. तांत्रिकी सल्लागार समितीच्या एकूण ५ बैठकी M/s Lewa Trading Industry & Contracting Pvt. Ltd. Saudi Arabia आणि M/s Suyog Telematic Pvt. Ltd. यांनी सादर केलेल्या दस्ताऐवजांची सखोल तांत्रिकी छाननी व मुल्यमापन करुन, योग्य ते स्पष्टीकरण मागविण्यात आले. योग्य स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर दोन्ही निविदाकारांना तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरविले. तद्नंतर तांत्रिकी सल्लागार समिती व महानगर आयुक्तांच्या निर्देशानुसार वित्तीय लिफाफा (Envelope-C) दिनांक १७/०८/२०२१ रोजी उघडण्यात आला. उघडलेल्या सर्व ई-निविदांची वित्तीय देकारांची माहिती खालीलप्रमाणे आहे:

| **अ.क्र.** | **वर्णन** | **M/s. Suyog Telematic Limited & M/s. Suyog Gurbaxani Funicular Limited (संघ)** | **M/s Lewa Trading Industry and Contracting ltd. Saudi, Arabia** |
|---|---|---|---|
| १ | वित्तीय प्रस्ताव | एक रक्कमी अनुदान मागणी रु. ४५०.०० कोटी | एक रक्कमी प्रिमीयम प्रदान (One Time Premium) रु. ७२.०० कोटी |

३.८ पुढे अशीही चर्चा झाली की, M/s. Lewa Trading Industry and Contracting Pvt. Ltd. Saudi Arabia यांनी रुपये ७२.०० कोटी एक रक्कमी ‘प्रिमियम’ प्राधिकरणास प्रदान करण्याचे प्रस्तावित केले. निविदा प्रस्तावातील अटी व शर्तीनुसार प्राधिकरणामार्फत सवलत करारनामा (Concession Agreement) साक्षांकीत झाल्यानंतर एक वर्षाच्या अटी पुर्तता कालावधी (Condition Precedent Period) मध्ये खालील परवानग्या प्राप्त करणे आवश्यक आहे.

१. पर्यावरण आणि वन मंजुरी मंत्रालय तटीय नियमन क्षेत्र (CRZ Clearance)
२. बांधकामासाठी Right of Way for
३. सेवावाहिनी स्थलांतर (Utility Shifting)
४. कायदेशीर अनुपालन प्राप्त करणे (Obtaining all legal compliances)
५. प्रकल्पासाठी लागणा-या जमिनीचे हस्तांतरण If any

तसेच Financial Closure of the Project विषयक आवश्यक कार्यवाही सवलतदारामार्फत करण्यात येईल.

३.९ महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने महावीर नगर मेट्रो स्थानक-पॅगोडा-गोराई (७.२ कि.मी.) या शहरी हवाई रज्जू मार्गाची सार्वजनिक-खाजगी-भागिदारी (PPP) तत्वावर अंमलबजावणी करण्यासाठी तसेच सवलतदाराची नियुक्ती करण्यासाठी दुसरा निविदा विनंती प्रस्ताव दि. १९ ऑगस्ट, २०२० रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध केला. वित्तीय लिफाफा (Envelope-C) उघडल्यास दोन निविदा प्राप्त झाल्या असून, एका संस्थेने प्राधिकरणाकडून एक रक्कमीय अनुदान मागणी केली असून (रु.४५०/- कोटी) तसेच दुस-या संस्थेने (रु. ७२/- कोटी) एक रक्कमी "प्रिमीयम" प्राधिकरणास प्रदान करण्याचे प्रस्तावित केले होते, अशी माहिती सदस्यांना देण्यात आली. M/s. Lewa Trading Industry and Contracting Pvt. Ltd. Saudi Arabia यांनी रुपये ७२.०० कोटी एक रक्कमी 'प्रिमियम' प्राधिकरणास प्रदान करण्याचे प्रस्तावित केले आहे तसेच M/s. Lewa Trading Industry and Contracting Pvt. Ltd. Saudi Arabia यांची सवलतदार म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात यावी अशी शिफारस समिती सदस्यांना केली. तसेच सदर कामासाठी आवश्यक असणा-या मंजुरी म्हणजेच पर्यावरण, वन मंजुरी व तटीय नियमन क्षेत्र मंजुरी प्राप्त करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी प्रस्तावित केले.

शहरी हवाई रज्जू मार्गाची अंमलबजावणी करतांना बांधकाम पुर्व स्वतंत्र अभियंताची नियुक्ती करण्यास निविदा प्राक्रिया प्राधिकरणामार्फत करण्यात येईल. तसेच स्वतंत्र अभियंत्यांच्या नियुक्तीच्या एकूण खर्चाची विभागणी ही प्राधिकरणामार्फत ५० % तसेच सवलतदारामार्फत ५०% याप्रमाणे करण्यात येईल.

**३.१० कार्यकारी समिती सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे :-**

- प्रस्तावित शहरी हवाई रज्जू मार्ग महावीर नगर मेट्रो स्थानक – पॅगोडा - गोराई हा पॅगोडा, गोराई बीच व एस्सेल वर्ल्ड सारख्या मनोरंजन क्षेत्राला जोडत असून प्रस्तावित असलेली वार्षिक प्रवासी संख्येचा मुख्य वर्ग हा मनोरंजनासाठी येणा-या प्रवाशांचा आहे. तसेच प्रस्तावित नफा-तोटा हिस्सा याबाबतच्या अटीनुसार प्राधिकरणाने सवलतदारास तोट्याचा हिस्सा (Pain share) जास्तीच्या प्रमाणात द्यावा लागण्याची शक्यता असल्याचे मत समितीने व्यक्त केले.
- प्राधिकरणामार्फत सवलत करारनामा (Concession Agreement) साक्षांकीत झाल्यानंतर एक वर्षाच्याअटी पूर्तता कालावधी (Condition Precedent Period) अंतर्गत

पर्यावरण आणि वन मंजूरी मंत्रालय तटीय नियमन क्षेत्र (Environmental, Forest & CRZ Clearance) यांची परवानगी/मान्यता प्राप्त होणे अवघड असून, नमूद केलेल्या एक वर्षाच्या कालावधी अटीनुसार न झाल्यास प्राधिकरणाचे आर्थिक नुकसान विचारात घेणे गरजेचे आहे अशी सदस्यांनी चर्चा केली.

- निविदा विनंती प्रस्तावास प्राप्त झालेले २ निविदाकार M/s. Lewa Trading Industry and Contracting Pvt. Ltd. Saudi Arabia आणि M/s Suyog Telematic Pvt. Ltd. यांना प्रत्यक्षात हवाई रज्जू अंमलबजावणी करण्याचा कोणताही अनुभव नसून, M/s. Lewa Trading Industry and Contracting Pvt. Ltd., Saudi Arabia यांना प्रस्तावित हवाई रज्जू मार्गाचे काम प्रदान करणे योग्य ठरणार नाही, असे मत समिती सदस्यांनी मांडले.
- तसेच समिती सदस्यांनी निर्देशित केले की, सध्याची निविदा प्रक्रिया बंद करुन नव्याने सुधारित अटी व शर्तीसह तसेच पात्रता निकषानुसार ठरविण्यात याव्यात व पुन्हा निविदा विनंती प्रस्ताव सादर करण्याबाबतचे निर्देश कार्यकारी समितीने दिले.

**बाब क्र. ४ : मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या डि एन नगर ते मंडाले या मेट्रो मार्ग २ ब प्रकल्पाच्या पॅकेज सीए ०६ मधील उर्वरित कामे, साखळी क्र. ४६८६०.३८४मी. ते ५२७२९.३१२ मी. पर्यंत भागाच्या उन्नत मेट्रो मार्गिकेचे व पाच उन्नत मेट्रो स्थानकांची छतांच्या कामांसह (मेट्रो स्थानकांची आर्किटेक्चरल वगळून) एमटीएनएल मेट्रो, एस जी बर्वे मार्ग, कुर्ला पूर्व, पूर्व द्रुतगती मार्ग आणि चेंबूर येथे भाग संकल्पन व बांधकाम व पद्धतीने (Part-Design and Construction) बांधकामाकरिता पॅकेज सी १०२ अंतर्गत मागविलेल्या ई- निविदांना मंजुरी देणेबाबत.**

४.१. महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले कि, मेट्रो मार्ग-२ब (डि. एन. नगर – मंडाळे) या मेट्रो मार्गाकरीता पॅकेज सीए-०६ साठी (एमटीएनएल, बीकेसी ते डायमंड गार्डन, चेंबूर उन्नत मेट्रो मार्ग व ०६ उन्नत मेट्रो स्थानके) दि. १८ नोव्हेंबर, २०१७ रोजी ई-निविदा (निविदा किंमत रु. ४८३.०५ कोटी) मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा प्रक्रिये अंतर्गत मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही.) यांची रु. ५२१.२१ कोटी (७.९०% जास्त) दराची लघुत्तम निविदा प्राप्त झाली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २५७ व्या बैठकीत मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही.) यांना

दि. १२ एप्रिल, २०१८ रोजी कार्यादेश देण्यात आला होता. परंतू, कामाच्या ३० महिन्यांच्या कालावधीतील २० महिने उलटून गेल्यानंतरही कंत्राटदार मे. एम.बी.झेड-आर.सी.सी.(जे.व्ही) यांनी फक्त २.७० % काम पूर्ण केले. प्रकल्प पुर्ण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, बांधकाम साहित्य व यंत्रसामुग्री उपलब्ध करणे मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही) यांना शक्य झाले नाही. तसेच कामाची प्रगती राखण्यात कंत्राटदार अपयशी ठरल्याने निविदा अटी व शर्तीनुसार कामाचा करारनामा दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी रद्द करण्यात आला. सदर करार संपुष्टात आणल्यानंतर व कंत्राटदारास बडतर्फ केल्यानंतर प्राधिकरणाने माहे फेब्रुवारी २०२० च्या पहिल्या आठवड्यात मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही.) यांनी प्राधिकरणास सादर केलेली बँक हमी (Performance Bank Guarantee and Additional Performance Bank Guarantee) (रु. ५७.३५ कोटी) जप्त करून त्याचे रोखीकरण केले. सदर कंत्राट समाप्तीबाबत मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. यांनी कंत्राटातील तरतूदीनुसार Arbitration ची मागणी केली. त्यानुसार सद्यस्थितीत सदर बाबतचे Arbitration Proceeding सुरु आहे.

४.२. चर्चेस अनुसरून पॅकेज सी १०२ च्या स्थापत्य कामासाठी कंत्राटदार मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही.) यांनी केलेल्या कामाची किंमत वगळून, नोव्हेंबर, २०१७ ते जानेवारी, २०२० या कालावधीसाठी ५% प्रती वर्षाप्रमाणे भाववाढ गृहीत धरुन रु. ४७४.५२ कोटी किंमतीच्या कामासाठी डीझाईन-बिल्ड पध्दतीच्या फेर निविदा दि. १९ फेब्रुवारी, २०२० रोजी मागविण्यात आल्याचे नमूद केले.

सदर निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा प्रक्रियेतील एक निविदाकार मे. लार्सन अँण्ड टुब्रो इन्फ्रास्ट्रक्चर यांनी पॅकेज सी १०१ आणि पॅकेज सी १०२ यांच्या चालू असलेल्या निविदा प्रक्रियेवर निविदेतील तरतूदीबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली होती. सदर बाबत पॅकेज सी १०१ आणि पॅकेज सी १०२ साठी निविदा शिफारस समितीची बैठक दिनांक ०३ ऑगस्ट, २०२० रोजी घेण्यात आली. सदर बैठकीत समितीने पॅकेज सी१०२ साठी निविदा प्रक्रिया रद्द करण्याची शिफारस केली. तसेच पॅकेज सी १०२ या पॅकेजमधील कामाच्या बाबत ऑयकॉनिक पुलाच्या (पॅकेज सी १०६) कामाचा वाव समाविष्ट करून संयुक्त स्थापत्य कामासाठी सुधारीत निविदा पुन्हा आंमत्रित कराव्यात अशी शिफारस निविदा शिफारस समितीने केली. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, पॅकेज सी-१०२ च्या कामात आयकॉनिक पुलाच्या स्थापत्य कामाच्या वावाचा समावेश करुन तसेच फेब्रुवारी, २०२० ते ऑगस्ट, २०२० या कालावधीतील

भाववाढ गृहित धरुन पॅकेज सी-१०२ साठी (रु. ५६८.५५ कोटी, सर्व करांसहित) नव्याने फेर ई-निविदा दि. २८ ऑगस्ट, २०२० रोजी प्रसिद्ध करण्यात आली. सदर निविदा प्रक्रियेत पॅकेज सी १०२ च्या कामासाठी निविदा किंमत पेक्षा २६.५१% अधिक देकाराचा मे. एन.सी.सी लि. यांचा देकार लघुत्तम होता. सदर बाबत निविदा शिफारस समितीबरोबर केलेल्या वाटाघाटीत लघुत्तम निविदादाराने सादर केलेला अंतिम देकार निविदेच्या किंमतीपेक्षा २२% अधिक (रु.६९३.६३ कोटी) होता. याबाबत निविदा शिफारस समितीच्या दि. ०८ मार्च, २०२१ रोजीच्या बैठकीत पॅकेज सी १०२ च्या अंमलबजावणीत असलेल्या सर्व अडचणींचा विचार करूनही निविदेवर २२% पेक्षा अधिक किंमतीचा देकार खूप जास्त असल्याच्या कारणास्तव निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने निविदा मागविण्याची शिफारस निविदा शिफारस समितीने केली.

४.३ मेट्रो मार्ग २ब पॅकेज सी १०२ च्या कामाकरिता नव्याने निविदा मागविण्यासाठी प्रकल्पाची अंदाजित किंमत सा. बां. विभागाच्या २०२०-२०२१ च्या राज्यस्तरीय दरसूचीवर आधारित रु. ६३१.८२ कोटी (सर्व करांसहित) अंतिम करून नव्याने बी ओ क्यु (BOQ) वर आधारीत फेर ई-निविदा १९ एप्रिल, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. परंतु, मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाच्या साधारण सल्लागाराने मेट्रो मार्ग ७ च्या कामात आलेल्या अनुभवाच्या आधारे पॅकेज सी १०२ च्या निविदा रद्द करुन कामाच्या वावात ५ स्थानकांच्या छताचे काम (पी.ई.बी.), रेल्वे परिसरात तसेच साबळे नगर येथे जाण्यासाठीचा पोहोच रस्ता अरुंद/कच्चा असल्याने कास्ट-इन-सिटु आय गर्डर (cast-in-situ ‘I’-Girder) उभारणे व मीठी नदीवरील आयकॉनिक पुलाऐवजी बॅलेन्स्ड कॉन्टिलिव्हर पीएससी बॉक्स गर्डर पुल (Balanced Cantilever PSC Box Girder Bridge) प्रस्तावित करुन नव्याने निविदा मागविण्याची शिफारस  प्राधिकरणास केली. त्यानुसार प्राधिकरणाने मेट्रो मार्ग-२ब च्या पॅकेज सी १०२ साठी निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने निविदा मागविण्यासाठी अनुमती दिली. पॅकेज सी १०२ साठी फेर निविदेची किंमत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२० - २०२१ च्या राज्यस्तरीय दरसूचीनुसार तयार करण्यात आली व कामाच्या वावात आयकॉनिक पुलाऐवजी बॅलेन्स्ड कॉन्टिलिव्हर पीएससी बॉक्स गर्डर पध्दतीचा पुल व पाच स्थानकांच्या छताच्या (पी ई बी) कामाच्या वावाचा समावेश करुन रु. ६३५.७१ कोटी (वस्तू व सेवा करासहित) किंमतीची निविदा तयार करण्यात आली. सदर कामासाठीच्या फेर निविदा दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी मागविण्यात आल्या.

उपरोक्त कामाचा लिफाफा 'अ' व लिफाफा 'ब' दि. ०१ ऑक्टोंबर २०२१ रोजी निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आला. उपरोक्त कामासाठी खालील तीन निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या :-

१. मे. एन.सी.सी. लि.

२. मे. जे. कुमार इंफ्राप्रोजेक्ट लि.

३. मे. टाटा प्रोजेक्ट्स लि.

४.४ अशीही चर्चा झाली की, प्राप्त ई-निविदांच्या पात्रतेची तांत्रिक छाननी मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार मे. आयका कॉन्सॉटीयम (M/s AICA Consortium) मार्फत करण्यात आली. सदर छाननी अहवालानुसार तिन्ही निविदाकार पात्र ठरले. तद्नंतर, तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरलेल्या तिन्ही निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा 'क') दि. ११ ऑक्टोंबर, २०२१ रोजी उघडण्यात आले. निविदाकारांनी सादर केलेल्या आर्थिक देकाराचा (लिफाफा 'क') तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे:

| **अ. क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **निविदा किंमत (रु.)** | **प्राप्त देकार (रु.)** | **% अधिक** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| **१.** | **मे. एन.सी.सी. लि.** | ६३५,७१,१४,४४६.०३ | **७९१,१५,३३,४३८.३९** | **२४.४५१%** | **L१** |
| २. | मे. जे. कुमार लि. | | ८१३,३२,९२,९७९.०७ | २७.९४०% | L२ |
| ३. | मे. टाटा प्रोजेक्ट्स लि | | ८२६,४७,८४,३६९.०० | ३०.००७% | L३ |

४.५ निविदा मुल्यमापन समितीच्या दि. १७ नोव्हेंबर, २०२१ व दि. १८ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत प्रकल्पाचे साधारण सल्लागाराने तयार केलेला आर्थिक छाननी अहवाल समितीस सादर करण्यात आला.

अ. साधारण सल्लागार मे. AICA Consortium यांनी सादर केलेल्या आर्थिक छाननी अहवालत नमूद केल्याप्रमाणे विविध कारणांमुळे उदा. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यस्तरीय दरसूचीमध्ये बदल झाल्यामुळे कंत्राटाच्या अंदाजित किंमतीच्या दरातील वाढ, अत्यंत गजबजलेल्या क्षेत्रामुळे येणाऱ्या अडचणी, बॅलेन्स्ड कॉन्टिलिव्हर पीएससी बॉक्स गर्डर पुल (Balanced Cantilever PSC Box Girder Bridge) च्या बांधकामासाठी लागणारे तात्पुरत्या स्वरूपातील विशिष्ट प्रकारचे फोमवर्क (Formwork) साठी लागणार खर्च, मनुष्यबळाच्या किमंतीत झालेली वाढ, मेट्रो प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या विशेष प्रकारच्या सुरक्षा व्यवस्थेवर करावा लागणार खर्च, संकल्पना शुल्क,

प्रयोगशाळा चाचणी शुल्क, रॉयल्टी शुल्क, कामगार विमा, उच्च क्षमतेच्या यंत्रसामग्रीवरील खर्च, इत्यादीमुळे पॅकेज सी १०२ साठी अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ होत असून याबाबतची परिगणना १७.७१% अधिक दराने होत असल्याचे नमूद केले.

ब. साधारण सल्लागारांचे विश्लेषण व निविदाकाराचा देकार यातील तफावत पाहता निविदा मुल्यमापन समितीने लघुत्तम निविदाकार मे. एन.सी.सी.लि. यांना वाटाघाटीसाठी बैठकीत आमंत्रित केले. लघुत्तम निविदाकाराने त्यांची प्राधिकरणासोबत दीर्घकाळ सुरु असलेली कामे लक्षात घेऊन निविदा सादर केलेल्या देकारापेक्षा १९.५०% अधिक कमी करण्यास सहमती दर्शवली. तसेच त्यापेक्षा देकार कमी करण्यास असमर्थता दर्शवली. मे. एन.सी.सी.लि. यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये १९.५०% अधिक दराचा सुधारित देकार प्राधिकरणास सादर केला.

क. तदनंतर, निविदा मुल्यमापन समितीने लघुत्तम निविदाकाराकडून आलेल्या सुधारित देकारावर अंतर्गत विचारविनिमय केला. सदर चर्चेदरम्यान पुढीलप्रमाणे बाबी निदर्शनास आल्या :-

१) मेट्रो मार्ग २ब प्रकल्प २००७ पासून नियोजित असून, प्रथमतः भारत सरकारच्या सूचनेनुसार सार्वजनिक- खाजगी भागीदारीतून (पी.पी.पी. तत्वावर) करण्यासाठी मे. मुंबई मेट्रो ट्रान्सपोर्ट प्रा. लि. (MMTPL) यांचेसोबत सवलत करारनामा (Concession Agreement) करण्यात आला. परंतु, सदर कामासाठीचे Financial Closure पूर्ण होऊ न शकल्याने सदर करारनामा २०१४ मध्ये संपुष्टात आणण्यात आला. तदनंतर शासनाच्या सूचनेनुसार मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मे. डी. एम.आर.सी. यांचेकडून तयार करून घेण्यात आला. उपरोक्त प्रमाणे सदरच्या निविदा जानेवारी] २०१७ मध्ये मागविण्यात आल्या होत्या. तथापि, अधिक देकारामुळे निविदा प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही.

२) पॅकेज सी १०२ (पूर्वी सीए ०६) साठी एकूण पाचव्यांदा निविदा मागविण्यात आली आणि दोनदा (सध्याच्या बोलीसह) प्राप्त झालेला देकार २२% अधिक आणि २४.४५% अधिक होते.

३) २०१८ मध्ये लघुत्तम निविदाकाराकडून प्राप्त देकार निविदा किंमतीच्या ७.९०% अधिक होता. देकार वाजवी मानून हे काम मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही.) यांना देण्यात आले. एप्रिल, २०१८ मध्ये मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही.) यांना कार्यादेश देण्यात आला. परंतु, कंत्राटदार मे. एम.बी.झेड-आर.सी.सी. (जे.व्ही.) यांनी ३० महिन्यांच्या करार कालावधीपैकी २० महिन्यांत केवळ २.७% प्रगती करू शकले. हे पाहता ठेकेदाराच्या संथगतीच्या कामगिरीमुळे सदरचा करार रद्द करावा लागला.

४) जानेवारी, २०२० मध्ये करार संपुष्टात आल्यानंतर, विविध कारणांमुळे प्रकल्पासाठीच्या निविदा फेब्रुवारी, २०२०, ऑगस्ट, २०२०, एप्रिल, २०२१ आणि ऑगस्ट, २०२१ मध्ये मागविण्यात आल्या.

ड. निविदा मुल्यमापन समितीने नमूद केले की, सदर पॅकेजची मेट्रो मार्गिका अत्यंत गजबजलेल्या क्षेत्रातून प्रस्तावित असून प्रकल्पाच्या कामात बरेच अडथळे आहेत उदा. अरुंद रस्ता, सदर मार्गावर सुरू असलेले इतर पायाभूत प्रकल्प, व्यस्त रहदारी, रेल्वे मार्गिका ओलांडणे (कुर्ला मेन लाईन्स, हार्बर लाईन्स; २६० मीटर लांबी), तीन मजल्याची दोन स्थानके, मेट्रो मार्गिका ४ च्या स्थानकासोबत एकत्रीकरण, आंतरराष्ट्रीय विमानतळ फनेल झोनमुळे उंचीचे निर्बंध, मिठी नदी ओलांडणे (१२० मीटर लांबी, बॅलन्स कॅन्टीलिव्हर पुल), बुलेट ट्रेन बोगदा दोन ठिकाणी ओलांडणे इत्यादी.

इ. निविदा मुल्यमापन समितीने असेही नमूद केले आहे की, मेट्रो मार्गिका २अ आणि ७ यांची कामे पूर्णत्वास आली असून दोन्ही मार्गिका २०२२ मध्ये कार्यान्वित होणे प्रस्तावित आहे. समितीने मेट्रो मार्ग २ब प्रकल्पास होत असलेला विलंब अपूर्ण कामामुळे जनतेस होणार त्रास, मेट्रो मार्ग २अ व ७ या प्रकल्पांच्या कार्यक्षम वापरावर होणारा परिणाम (मेट्रो मार्ग २अ, ७ व २ब यांची एकत्रित साखळी व तिन्ही मार्गासाठी प्रस्तावित मंडळे मेगा डेपो), स्थापत्य कामांच्या विलंबामुळे मेट्रोच्या रोलिंग स्टॉक, सिग्नलिंग या दूरसंचार प्रणाली, स्वयंचलित तिकीट यंत्रणा, विद्युत व यांत्रिकी कामे. ई. कंत्राटावर होणारा परिणाम बाबी विचारात घेतल्या.

४.६ कार्यकारी समिती सदस्यांनी निविदा किंमत अंतिम कशी करण्यात आली अशी विचारणा केली असता सदर निविदा किंमत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२०-२०२१ च्या राज्यस्तरीय दरसूचीनुसार अंतीम करण्यात आली आहे असे समितीच्या निदर्शनास आणण्यात आले. तसेच कामाची अंदाजपत्रकीय किंमत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२१-२२ च्या चालु दरसुचीनुसार पडताळण्यात आली असता ती निविदा किंमतीच्या ४.९६% अधिक असल्याची कार्यकारी समितीने नोंद घेतली. कार्यकारी समिती सदस्यांनी असेही नमूद केले की, सदर कामास सद्यस्थितीत मोठा विलंब झाला आहे. तसेच, फेर-निविदा मागविल्यास लघुत्तम निविदाकाराने दिलेल्या देकारापेक्षा जास्त वाजवी देकार प्राप्त होण्याबाबत असलेली अनिश्चितता व त्यामुळे कामास आणखी विलंब होण्याची शक्यता आहे. तसेच मेट्रो मार्ग – २ब मार्गिकेच्या डेपोसह इतर कामे सुरू असून सी-१०२ प्रकल्पास अधिकचा विलंब झाल्यास संपूर्ण मेट्रो मार्ग – २ब पूर्ण होण्यास विलंब होईल.

उपरोक्त बाबी विचारात घेऊन कार्यकारी समितीने लघुत्तम निविदाकाराने दिलेला निविदा किंमतीच्या १९.५०% अधिक दराचा देकार स्विकारण्यास मान्यता दिली.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४२१ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोट कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो मार्ग २ब प्रकल्पातील पॅकेज सी - १०२ (एम.टी.एन.एल, बीकेसी ते डायमंड गार्डन, चेंबूर) उन्नत मेट्रो मार्गाच्या बांधकामासाठी मे. एन.सी.सी. लि. यांनी सादर केलेला रु. ७५९,६७,५१,७६३/- किंमतीचा (वस्तू व सेवा करासह) (निविदा रक्कमेपेक्षा अधिक १९.५०% दराचा) लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. ५ : प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील संचालक (प्रकल्प) पदावरील नियुक्तीस मंजूरी देण्याबाबत.</u>**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे प्रस्तावित केले की, मुंबई महानगर प्रदेशात मेट्रो प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची गरज विचारात घेता प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीत ठराव क्र. १३३८ अन्वये प्राधिकरणाच्या आस्थापनेवर नव्याने पदे निर्माण करण्यात आली. मेट्रो प्रकल्पाकरीता निर्माण करण्यात आलेल्या सदर पदांपैकी "संचालक (प्रकल्प)" वेतन मॅट्रीक्स एस-३० : रु. १४४२०० – २१८२०० हे वरिष्ठ वेतनश्रेणीतील पद असल्याने प्राधिकरणाचे नियुक्ती प्राधिकारी या नात्याने सदर पदावर नेमणूकीकरीता कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून खालीलप्रमाणे विभागीय पदोन्नती समिती गठित करण्यात आली :-

| | |
|---|---|
| महानगर आयुक्त | अध्यक्ष |
| अतिरिक्त महानगर आयुक्त (१) | सदस्य |
| अतिरिक्त महानगर आयुक्त (२) | सदस्य |
| सह महानगर आयुक्त | सदस्य |
| वित्तीय सल्लागार | सदस्य |
| संचालक (प्रकल्प), मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखा | सदस्य |
| श्री.पी.एम. यादव, प्रमुख, नगर रचना | मागासवर्गीयांचे प्रतिनिधी |
| तहसीलदार (आस्थापना) | सदस्य सचिव |

५.२ चर्चेस अनुसरून प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "संचालक (प्रकल्प) हे पद पदोन्नतीने भरण्याकरीता उपरोक्त विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक २१ डिसेंबर, २०२१ रोजी आयोजित करण्यात आली होती. मेट्रो प्रकल्पावर मागील ५ वर्षांपासून मुख्य अभियंता (स्थापत्य) -मेट्रो या पदावर कार्यरत असलेले श्री.बसवराज मा.भद्रगोंड यांना पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय पदोन्नती समितीसमोर सादर करण्यात आला होता. श्री. बसवराज मा. भद्रगोंड मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो हे संचालक (प्रकल्प) या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक, अनुभव आणि तांत्रिक अर्हता धारण करीत असल्यामुळे विभागीय पदोन्नती समितीने श्री. बसवराज मा. भद्रगोंड यांची "संचालक (प्रकल्प)" या पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी एकमताने शिफारस केली. तरी कार्यकारी समितीस विनंती करण्यात येत आहे की, श्री. बसवराज मा. भद्रगोंड यांची "संचालक (प्रकल्प)" या पदावर नेमणूकीस मंजूरी देण्यात यावी.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४२२:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे श्री. बसवराज माडेप्पा भद्रगोंड, मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो यांना "संचालक (प्रकल्प)" वेतन मॅट्रीक्स एस-३० : रु. १४४२००-२१८२०० या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देत आहे. तसेच उपरोक्त परिच्छेद ५.१ अनुसार गठीत केलेल्या पदोन्नती समितीस याद्वारे मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदावरील नेमणुकीस मान्यता देणेबाबत**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे प्रस्तावित केले की, प्राधिकरणाच्या आस्थापनेवर वेतनस्तर एस्-२९ : रु.१,३१,१००-२,१६,६०० या वेतनश्रेणीतील "**प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग**" हे मंजूर पद आहे. सदर पद दिनांक ०१-०९-२०१९ पासून रिक्त असून ते एकाकी पद आहे. सदर रिक्त पद भरण्याच्या दृष्टीने दिनांक ०९-०६-१९९७ रोजीचे सेवाप्रवेश नियम जसेच्या तसे ठेवून दिनांक २८ एप्रिल, २०२१ रोजी जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. जाहिरातीस अनुलक्षून ४ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार एकूण ३ उमेदवार मुलाखतीस पात्र ठरले होते.

६.२ **प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग** हे पद सरळसेवेने भरण्याकरीता कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खालील निवड समिती गठित करण्यात आली होती :-

| अनु.क्र. | विभागीय निवड समिती | पदनाम |
|---|---|---|
| १ | महानगर आयुक्त | अध्यक्ष |
| २ | अतिरिक्त महानगर आयुक्त (१) | सदस्य |
| ३ | सह महानगर आयुक्त | सदस्य |
| ४ | वित्तीय सल्लागार, मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | सदस्य |
| ५ | श्री.सु.अ.वांढेकर, प्रमुख अभियंता, अभियांत्रिकी विभाग | सदस्य |
| ६ | श्री. पी. एम. यादव, प्रमुख, नगर रचना | मागासवर्गीयांचे प्रतिनिधी |
| ७ | तहसिलदार (आस्थापना) | सदस्य – सचिव |

६.३ चर्चेस अनुसरून प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदाकरिता पात्र ठरलेल्या ३ उमेदवारांना दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी मुलाखतीकरिता बोलावण्यात आले होते. सदर ३ उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव व पात्रतेच्या आधारे निवडसमितीने एकमताने श्री. मृत्यूंजय सि. देवरु यांची प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदाकरिता शिफारस केली आहे. श्री. मृत्यूंजय सि. देवरु हे सद्यस्थितीत प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत असेही नमूद करण्यात आले.

६.४ श्री. मृत्यूंजय सि. देवरु यांची प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदावर सरळसेवेने नेमणूकीस तसेच सदर पद सरळसेवेने भरण्याकरिता गठित करण्यात आलेल्या निवड समितीस मंजूरी प्रदान करावी अशी कार्यकारी समितीस विनंती करण्यात आली.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४२३:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन श्री. मृत्यूंजय सि. देवरु यांची वेतनस्तर एस्-२९ : रु.१,३१,१००-२,१६,६०० या वेतनश्रेणीतील प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदावरील नेमणूकीस

तसेच सदर पद सरळसेवेने भरण्याकरिता गठित करण्यात आलेल्या निवड समितीस याद्वारे मान्यता देत आहे.

"**असा ठराव करण्यात आला आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र. ७ : प्राधिकरणाचे दिनांक ३०.०९.२०२१ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

७.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

७.२ त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**निर्णय: सदर त्रैमासिक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. ८ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल – दिनांक ०१ जुलै, २०२१ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ व दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२१ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२१**

८.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ०१ जुलै, २०२१ ते ३१ डिसेंबर, २०२१ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली.

८.२ त्यानंतर, कार्यकारी समितीने दिनांक ०१ जुलै, २०२१ ते ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय : सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. ०९: मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या पॅकेज - ४ इंटेलिजंट ट्रान्सपोर्ट सिस्टीम (ITS), टोल मॅनेजमेंट सिस्टम, इलेक्ट्रिकल कामे, हायवे आणि ब्रिज स्ट्रीटलाईटिंग सिस्टम, टोल प्लाझाचे बांधकाम आणि कंट्रोल सेंटरसह प्रशासकीय इमारतींची रचना, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग करीता निविदा स्विकारणेस मान्यता देणेबाबत.**

९.१ महानगर आयुक्तांनी या प्रस्तावाविषयी माहिती देतांना असे सांगितले की, मुंबई पारबंदर प्रकल्पामध्ये मुंबई शहरातील शिवडी व नवी मुंबईतील चिर्ले यांना जोडणाऱ्या २२ कि.मी. लांबीच्या ६ पदरी (३+३ मार्गिका) पुलाचा अंतर्भाव आहे. या पुलाची समुद्रातील लांबी सुमारे १६.५ कि.मी. असून जमिनीवरील पुलाची (Land viaduct) लांबी सुमारे ५.५ कि.मी. इतकी आहे. या पुलाला मुंबई शहरातील शिवडी येथे आणि नवी मुंबईतील शिवाजी नगर येथे व राष्ट्रीय महामार्ग -४ ब वर

चिर्ले गावाजवळ आंतरबदल (Interchange) आहेत. मुंबई पारबंदर प्रकल्पाची अमंलबजावणी जपान आंतरराष्ट्रीय सहकार संस्था (जायका) (Japan International Corporation Agency – JICA) या जपानी संस्थेकडून कर्ज प्राप्त करुन इंजिनिअरींग-प्रोक्युरमेंट-कन्स्ट्रक्शन (डिझाईन-बिल्ड) (EPC-Design Build) पध्दतीने करण्याचे ठरविण्यात आले.

९.२ जायकाने या प्रकल्पाच्या सर्वेक्षणाकरीता सल्लागार नियुक्त करुन इतर प्रकल्पाकरीता कर्ज देण्याबाबत व्यवहार्यता तपासण्याकरीता त्यांचे सल्लागाराकडून माहे एप्रिल, २०१५ ते नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत प्रकल्पाचे सर्वेक्षण (Preparatory Survey) केले. या सर्वेक्षणामध्ये तांत्रिक बाबींसोबतच प्रकल्पाचा पर्यावरणावर व सामाजिक जीवनावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करण्यात आला. प्राथमिक सर्वेक्षणाअंती जायकाने तयार केलेल्या अंतिम अहवालामध्ये नमुद केल्यानुसार जायकाने प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत सुमारे ₹.१७,८४३ कोटी इतकी निश्चित केली. या किंमतीमध्ये बांधकामाची किंमत (सुमारे ₹. १३,३८५ कोटी), आकस्मिक बाबींवरील खर्च (सुमारे ₹. १३४० कोटी), भूसंपादन (सुमारे ₹. ९९६ कोटी) आणि सल्लागार सेवा,लवाद, प्रशासकीय खर्च, व्हॅट, आयातीवरील कर, बांधकामाच्या कालावधीतील व्याज इ. बाबींचा (सुमारे ₹. २,१२२ कोटी) समावेश असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

९.३ चर्चेस अनुसरून प्रकल्पाच्या ₹. १७,८४३ कोटी या एकूण अंदाजित किंमतीस प्राधिकरणाने दिनांक ३ जून, २०१६ रोजी झालेल्या १४०व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता असल्याचे महानगर आयुक्तांनी नमुद सांगितले.

९.४ तद्नंतर, प्रकल्पाकरीता आंतरराष्ट्रीय एइकॉम एशिया कंपनी लि. (हाँगकाँग) – पडेको कंपनी लि. (जपान)- दार-अल-हंदाश (लेबनॉन) – टी.वाय.लिन इंटरनॅशनल (अमेरीका) कंन्सोर्शिअम यांची मुंबई पारबंदर प्रकल्पाचे सल्लागार (General Consultant) म्हणुन डिसेंबर, २०१६ मध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. प्रकल्पाच्या वरीलप्रमाणे एकूण अंदाजित किंमतीच्या सुमारे ८५% इतक्या, म्हणजेच सुमारे ₹.१५,१०० कोटी इतक्या रक्कमेपर्यंत कर्ज जायकातर्फे देण्यात येईल. सदर प्रकल्पास कर्ज देणेबाबतच्या करारावर जायकासोबत दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. तसेच केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाने (Ministry Of Environment & Forest) मुंबई पारबंदर प्रकल्पास कोस्टल रेग्युलेशन झोन विषयक मान्यता (CRZ Clearance) तसेच व वन जमीन हस्तांतरणास मान्यता (Stage -१ Clearance for Diversion of Forest Land) दिल्याचे महानगर आयुक्तांनी समितीस सांगितले.

९.५ चर्चेदरम्यान प्रकल्पाची सद्य:स्थितीची माहिती देतांना असे सांगितले की, जायकाने मुंबई पारबंदर प्रकल्पाचे बांधकाम एकुण ४ पॅकेज मध्ये करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यापैकी ३ स्थापत्य कामाचे पॅकेजेस (Civil works) व चौथा भाग सुनियोजित वाहतुक प्रणाली (Intelligent Transport) या कामाचे पॅकेज आहे. प्रकल्पाच्या पॅकेज-१ करीता लार्सन अँड टुब्रो लि.- आयएचआय इन्फ्रास्ट्रक्चर सिस्टीम कं. लि. कंसोर्शिअम यांची, पॅकेज-२ करीता देवू इंजिनिअरींग अँड कन्स्ट्रक्शन कंपनी लि. व टाटा प्रोजेक्ट्स लि. जेव्ही यांची आणि पॅकेज-३ करीता लार्सन अँड टुब्रो लि. यांची कंत्राटदार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर कंत्राटदारांना दि. २३ मार्च, २०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या बांधकामाचे काम प्रगतीपथावर असून पॅकेज- १,२ व ३ यांच्या एकूण सद्य:स्थितीत प्रत्यक्ष कामाची प्रगती ७०% पूर्ण झाली आहे.

९.६ मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या पॅकेज -४ मध्ये इंटेलिजंट ट्रान्सपोर्टेशन सिस्टम (ITS), टोल व्यवस्थापन प्रणाली, वाहतूक व्यवस्थापन प्रणाली आणि संबंधित फायबर ऑप्टिक प्रणाली, सर्व सब स्टेशन्स, टोल प्लाझा, प्रशासकीय इमारती आणि ऑपरेशन इमारतींवर सुरक्षा पाळत ठेवणे, SCADA ऑटोमेशन सिस्टमसह इलेक्ट्रिकल पॉवरिंग सिस्टम, हायवे स्ट्रीट लाइटिंग सिस्टम आणि निर्दिष्ट सौंदर्याचा प्रकाश आणि नियंत्रणे प्रदान करणे, अत्याधुनिक इंटिरिअर्स, फर्निचर आणि मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, प्लंबिंग आणि फायर फायटिंग (MEPF) सेवांसह ऑपरेशन कंट्रोल सेंटर आणि ऑफिस बिल्डिंगसह प्रशासकीय इमारतींचे बांधकाम, संबंधित मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, प्लंबिंग आणि फायर फायटिंग (MEPF) सेवांसह टोल प्लाझाचे बांधकाम इ. वरील कामाच्या व्याप्तीसाठी, तपशीलवार अंदाजे किंमत खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **बाबी** | **अंदाजित रक्कम (₹. कोटी)** |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण बाबी | २७.६४ |
| २ | डॉक्युमेंटेशन | ०.३१ |
| ३ | स्थापत्य बांधकाम | ८२.४३ |
| ४ | विद्युत कामे | २९६.५० |
| ५ | टोल व्यवस्थापन प्रणाली | २६.६९ |
| ६ | प्रगत वाहतुक व्यवस्थापन प्रणाली | २६.५३ |
| ७ | एकुण (A) ( १+६) | ४३५.२४ |
| ८ | प्रोव्हिजनल सम (B) | २२.०० |
| | एकूण अंदाजित किंमत (INR) | **४५७.२४** |

९.७ अशी चर्चा करण्यात आली की, जायकाने विहीत केलेल्या पध्दतीनुसार पॅकेज- ४ इंटेलीजंट ट्रान्सपोर्ट सिस्टीम कंत्राटाद्वारे नियुक्ती करण्यात ई-निविदा (Bidding Process) पध्दतीने मागविण्यात आले आहे. सल्लागारांनी तयार केलेली बोली दस्तऐवज जायकाला (JICA) प्राधिकरणाने दिनांक ०५ जुलै, २०२१ रोजी पत्र क्रमांक MMRDA/MTHL-PIU/JICA/Pkg-४/Bid Document/०४१२/२०२१ व्दारे सहमतीसाठी सादर केले होते. जायकाचे (JICA) पत्र क्रमांक JICA (ID) २०२१-३४९ दिनांक २४ ऑगस्ट २०२१ ने 'ना हरकत' दिली आहे.

९.८ प्राधिकरणाने दिनांक ०३ सप्टेंबर २०२१ रोजी रीतसर प्रक्रियेनुसार सकाळ व इकॉनॉमिक टाईम्स या अग्रगण्य वर्तमानपत्रात जाहिरात व ई-निविदा पोर्टलवर प्रकाशित केली. दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी निविदा पूर्व बैठक घेण्यात आली. त्याचप्रमाणे ई-निविदा पोर्टलवर तीन (३) परिशिष्ट, १०६ आयटम आणि तीन (३) प्रतिसाद ( Addendum ) दस्तऐवज निविदाकारांसाठी अपलोड केले गेले. ई-निविदेत सुधारणा करून निविदाकारांसाठी सादर करण्याची तारीख १३ डिसेंबर, २०२१ पर्यंत वाढविण्यात आली. प्राप्त निविदाची छाननी करण्याकरीता प्राधिकरणाने दि. २१ ऑक्टोबर, २०२१ रोजी पत्र क्रमांक ईडी/एमएमआरडीए/बिड इव्हॅल्युएशन कमिटी/२१ द्वारे ७ (सात) सदस्यांचा समावेश असलेली निविदा मूल्यांकन समिती स्थापन करण्यात आली. दिनांक २० डिसेंबर २०२१ रोजी सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पॅकेज-४ करीता खालील ३ निविदाकारांनी निविदा सादर केल्या.

१. M/s TATA Projects Ltd.
२. M/s STRABAG Infrastructure & Safety Solutions GmbH& STRABAG AG JV
३. M/s Larsen & Toubro Limited, India.

९.९ पुढे असेही नमुद करण्यात आले की, निविदा मूल्यांकन समिती ( Bid Evaluation Committee) समोर सादर प्राप्त निविदांची छाननी सामान्य सल्लागाराकडून (GC) जायका मार्गदर्शक तत्वानुसार खालील ५ टप्प्यांमध्ये करण्यात आली :-

टप्पा-१: Preliminary Examination of Technical Bids
टप्पा-२: Evaluation of Compliance with the Qualification Requirement
टप्पा-३: Determination of Responsiveness of Technical Bids
टप्पा-४: Technical Evaluation
टप्पा-५: Financial Evaluation

९.१० सामान्य सल्लागार (GC) द्वारे टप्पा-४ पर्यंतचा तांत्रिक मूल्यमापन अहवाल निविदा मूल्यांकन समिती समोर दि. १९.०१.२०२२ रोजी सादर करण्यात आला असुन दिनांक १९/०१/२०२२ रोजी JICA कडे संमतीसाठी पाठविण्यात आला. जायकाने या अहवालास दिनांक १५/०२/२०२२ रोजी सहमती दर्शविल्यानंतर खालील निविदाकारांचे आर्थिक देकार (Financial offers) दि. १६.०२.२०२२ रोजी संबंधित निविदाकारांसमोर उघडण्यात आल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

९.११ प्राधिकरणाने स्थापन केलेल्या निविदा मूल्यांकन समितीने (Bid Evaluation Committee) सल्लागाराच्या सहाय्याने निविदेतील निकषांच्या आधारे निविदाकारांच्या आर्थिक देकारांची छाननी केली. आर्थिक देकारांच्या छाननीअंती पॅकेज -४ च्या निविदाकारांचे डिस्काउंटचा विचार करता आर्थिक देकार (Discount Bid Price) खालीलप्रमाणे :-

**(Rs. in crore)**

<table>
<tr><th>Sr. no.</th><th>Name of Bidder</th><th>Estimated cost Including all taxes and provision sum</th><th>Discount Bid Prices in INR including GST & Provisional Sum</th><th>Position</th><th>Remark</th></tr>
<tr><td>1</td><td>JV M/s STRABAG Infrastructure & Safety Solutions GmbH & STRABAG AG</td><td rowspan="3">₹. 457.24</td><td>₹. 427.00</td><td>L1 (Lowest)</td><td>-6.61%</td></tr>
<tr><td>2</td><td>M/s L&T</td><td>₹. 599.97</td><td>L2</td><td>M/s L&T ने किंमत शेड्यूल १ ते ६ वर ७.५% सूट देऊ केली आहे.</td></tr>
<tr><td>3</td><td>M/s TATA</td><td>₹. 646.58</td><td>L3</td><td></td></tr>
</table>

M/s STRABAG Infrastructure & Safety Solutions GmbH & STRABAG AG JV यांचा आर्थिक देकार हा लघुत्तम (Lower) असल्याचे महानगर आयुक्तांनी समितीच्या निदर्शनास आणले.

९.१२ चर्चेच्या अनुषंगाने माहिती देताना असे सांगितले की, निविदा मूल्यांकन समितीने शिफारस केल्यानुसार, लघुत्तम बोलीदाराकडून तफावतीबाबत स्पष्टीकरण प्राप्त करुन घेण्यात आले. M/s स्ट्रॅबॅग च्या दिनांक ०९/०३/२०२२ रोजीच्या पत्र क्रमांक MMRDA/Response/०१ नुसार आयटम क्र. १०७,४०३,४११,४२०,५०२,६०२ आणि ६०७ मधील रिक्त सोडलेल्या किंमतीबाबतचे स्पष्टीकरण प्राप्त झाले असून याबाबत दि. १०.०३.२०२२ रोजी निविदा मूल्यांकन समितीच्या पुनश्च बैठकीच्या इतिवृत्तानुसार M/s STRABAG JV ला उद्धृत किंमत बोली मूल्याची

(quoted Price bid value) शिफारस केली. शिफारस झालेली बोली पॅकेज -४ च्या अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ६.६१% कमी आहे.

**निर्णय : या संदर्भात महानगर आयुक्त यांनी सदर प्रकल्पाचे तपशिलवार सादरीकरण केले. तद्नंतर, चर्चेअंती बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र. १४२४ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या पॅकेज -४ करीता JV M/s STRABAG Infrastructure & Safety Solutions GmbH & STRABAG AG यांचा ₹. ४२७.०० कोटी (Including GST & Provisional Sum) किंमतीचे देकार, वस्तु व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आतापर्यंत झालेले बदल व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतुदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्याच्या अधीन राहून, स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. १०: मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ३१ मार्च,२०२१</u>**

१०.१ महानगर आयुक्त यांनी मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधीबाबत संक्षिप्त माहिती दिली.

१०.२ त्यानंतर दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० ते ३१ मार्च, २०२१ रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय : मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**<u>बाब क्र. ११: प्राधिकरणाचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

११.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

११.२ त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**निर्णय: सदर त्रैमासिक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*******